मुंबई टाइम्स



वर्षा उसगांवकरला तिच्या गायनाच्या आवडीचे सूर पुन्हा सापडले आहेत... 3

मंगळवार, २७ मे २००८ ■ महाराष्ट्र टाइम्स

● मुंबई टाइम्स टीम

# सप्तचक्रं, प्रभावळ आता कम्प्युटरवर

युरोप-अमेरिकेत योगाचं जोरदार मार्केटिंग करण्यात आलं. आता युरोपीय देशांनी शरीरातली सात चक्रं, ऑरा (प्रभावळ) या भारतीय संकल्पनाही सॉफ्टवेअरच्या चौकटीत बसवून त्यावर इलेक्ट्रॉनिक प्रयोग सुरू केले आहेत. या उपकरणांच्या मार्केटिंगचं वारं मुंबईपर्यंत आलंय.

ऑरा आणि चक्र यावर कम्प्युटरच्या माध्यमातून बरेच प्रयोग सुरू आहेत. माणसाचं मानसिक आणि शारीरिक आरोग्य उत्तम असेल तर शरीराभोवतीचं मॅग्नेटिक फील्ड प्रभावी असतं. तुमच्या मानसिक आणि शारीरिक शक्ती क्षीण झाल्या की या मॅग्नेटिक फील्डमध्येही बिघाड झालेला दिसतो, हे सिद्ध करणारं सॉफ्टवेअर तयार केल्याचा दावा परदेशातील काही तज्ज्ञांनी केलाय. मूल आजारी पडलं की आजही काही आया मीठ-मोहरीने त्याची नजर काढतात. हा शरीराची ऑरा स्वच्छ करण्याचा प्रकार असल्याचा दावा काही रेकीतज्ज्ञ करतात. हाच आधार वापरून रेकीमध्ये मिठाने ऑरा क्लीनिंग केलं जातं. याच्याही पुढे पाऊल टाकून फ्रान्समध्ये ऑरा क्लीनिंग करणाऱ्या सॉफ्टवेअर आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणाची निर्मिती सुरू झाली आहे. या उपकरणाद्वारे ऑरामध्ये किंवा चक्रात असलेले बिघाड तुम्हाला कम्प्युटरच्या स्क्रीनवर पाहायला मिळतात आणि चक्रातील बिघाड दूर केले जाऊ शकतात, असा दावा या उपकरणाच्या निर्मात्यांनी केलाय. ही उपकरणं अत्यंत महागडी असूनही ती भारतात आयात केली जातात हे विशेष. अर्थात आयात करणाऱ्यांची संख्या बोटावर मोजण्याइतकीही नाही.

लाइफ इन्फर्मेशन सिस्टममध्ये तुमच्या चक्रात काही बिघाड असला तर कम्प्युटरच्या स्क्रीनवर त्या त्या चक्राच्या ठिकाणी तो लाल रंगात दिसतो आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणाच्या साहाय्याने त्यावर उपचार केले जातात, असा ती बनवणारांचा दावा आहे. हेच यंत्र तुमच्या गुणसूत्राच्या अनुषंगाने उपयुक्त रत्नांची शिफारस करतं, असं सांगितलं जातं. शरीराच्या कथित ऑरामध्ये काही बिघाड झाला असेल तर तो स्वच्छ करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक क्रिस्टल थेरपीचा वापर करण्यात येतो. स्फटिकांमधून इलेक्ट्रॉनिक लहरी सोडून ओरा स्वच्छ केला जातो, असे दावे या उपकरणाबाबत केले जातायत. रिझॉल्युशन फिल्ड इमेज हे उपकरण ओराचा कम्प्युटराइज्ड ग्राफ तयार करते. त्यासाठी शरीरातील ४० बिंदू आणि सात चक्रांचं रीडिंग घेतलं जातं, असा उपकरणाच्या निर्मात्यांचा दावा आहे.

नक्षत्र ज्योतिषप्रवीण तुषार सावडावकर अशी उपकरणं वापरणाऱ्यांपैकी एक. त्यांनी ही उपकरणं अत्यंत प्रभावी असल्याचं सांगितलं.



mumbaitimes@indiatimes.com